नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 27/07/2020 (सोमवार)
(दुपार)

---

## रेती चोरी करणाऱ्या आरोपी अटक

पो.स्टे. भिवापुर :– अंतर्गत 15 किमी अंतरावर मौजा भिसी उमरेड रोड भगवानपुर फाटा येथे दिनांक 27/07/2020 चे 12.00 वा. दरम्यान स्थानिक गुन्हे शाखा, ना.ग्रा चे पथक हे पो. स्टे भिवापुर हद्दीत पेट्रालींग करीत असता भिवापुर मार्गाने येणारा एमच–40/बीजे–4958 क्रमांकाचा टिप्परचा चालकाला मौजा भिसी उमरेड रोड भगवानपुर फाटा येथे थांबवून तपासले असता सदर वाहन चालक आरोपी नामे– नितेश उर्फ बिटु मनोहर मोटघरे, वय 25 वर्ष, रा. विरली खंडार ता. पवनी जि. भंडारा याने त्याच्या ताब्यातील वाहनात विनापरवाना अवैधरित्या 5 ब्रास रेती किं. 25,000/– रू. भरून वाहतुक करतांना मिळुन आला. वाहनासह एकुण 20,25,000/–रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सर तर्फे पोहवा संतोष पंढरे, स्थानिक गुन्हे शाखा यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. भिवापुर येथे आरोपीविरुध्द कलम 379, 109 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे. पुढील तपासा करीता आरोपीला पो. स्टे. भिवापुर च्या ताब्यात देण्यात आले.

सदरची कार्यवाही पोलीस अधिक्षक श्री राकेश ओला व अपर पोलीस अधिक्षक श्रीमती मोनिका राऊत यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री अनिल जिट्टावार, पोहवा संतोष पंढरे, पोहवा रमेश भोयर, पोहवा मदन आसतकर, पोशि राधेश्याम कांबळे, पोशि बालाजी साखरे, चालक पोहवा भाऊराव खंडाते यांनी यशस्वीरित्या पार पाडली.



## खून

पो.स्टे. मौदा :– अंतर्गत 16 कि. मी अंतरावर भुगाव, ता. कामठी येथे दिनांक 25/07/2020 चे 16.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– लुकराम बळीराम आंबीळडुके, वय 58 वर्ष, रा. भुगाव ता. कामठी हे गावातील पोलीस पाटील असुन आरोपी नामे– विकास विजय वंजारी, वय 33 वर्ष, रा. भुगाव ता. कामठी व मृतक नामे– दशरथ विजय वंजारी, वय 30 वर्ष हे दोन्ही सख्खे भाऊ आहेत. मृतक याने आपले पत्नीशी भांडण केले व त्या भांडणात आई–वडीलांना मारपीठ केली असता आरोपीने मृतक हा रोजरोज दारु पीवुन पत्नीशी भांडण का करतो व आई वडीलांना मारहाण का करतो? या कारणावरुन आरोपीने मृतक यास मोठी लाकडी झीलपीने डोक्यावर, पायावर, पाठीवर मारहाण करून त्याला गंभीर जखमी करून जिवानीशी ठार मारले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरून पो. स्टे. मौदा येथे आरोपीविरूद्ध कलम 302 भादंवी अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री आगासे पो.स्टे मौदा मो.क्र 9130001715 हे करीत आहे.

## घरफोडी

पो.स्टे. खापा :– अंतर्गत 7 कि.मी अंतरावर मौजा वाकोडी येथे दिनांक 25/07/2020 चे 23:00 वा. ते दिनांक 26/07/2020 चे 08:30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– झामाजी केशवराव दलाल, वय 58 वर्ष, रा. वाकोडी यांचे दुकानाचे लोखंडी वेन्टीलिटर ची ग्रिल अज्ञात आरोपीने काढुन दुकानात प्रवेश केला. यानंतर आरोपीने दुकानाचे काऊंटर मध्ये ठेवलेले नगदी 5,35,000/– रु. चा मुद्देमाल चोरी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. खापा येथे आरोपीविरुध्द कलम 457, 380 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री झांबरे हे करीत आहे.

## विनयभंग

1) पो.स्टे. काटोल :– दि. 25/07/2020 चे 20.00 वा. ते 20.50 वा. चे सुमारास 33 वर्षीय पिडीत/फिर्यादी या घरासमोर बसल्या असता आरोपी नामे क्र. 1) रवि वानखेडे हा तेथे दारू पिवुन आला व फिर्यादीच्या पतीला शिवीगाळ केली. त्यादरम्यान फिर्यादीने "शिवीगाळ का करता"? असे आरोपीस हटकले. याकारणावरून आरोपी क्र. 2) हिम्मत मारबते याने फिर्यादीला हात पकडुन ढक्कलढुक्कल करून तिच्या मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला फिर्यादीचे पती मदतीला मध्यस्ती आले असता आरोपी क्र. 1) व 3) अजय खंडाते, सर्व रा. रिधोरा यांनी फिर्यादीच्या पतीला शिवीगाळ करून हातबुक्कीने मारहाण केली व पुन्हा मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपीतांविरुध्द कलम 354, 323, 504, 506, 34 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सफौ. जवाहर चव्हाण 9545363121 हे करीत आहे.

2) पो.स्टे. काटोल :– दि. 25/07/2020 चे 20.00 वा. ते 20.45 वा. चे सुमारास 37 वर्षीय पिडीत/फिर्यादी या घराशेजारी राहणारे भाऊ व आई सोबत आरोपी नामे क्र. 1) रोशन गायकवाड यांचे भांडण सुरु असतांना फिर्यादी त्यांचे भांडण सोडविण्यास मध्यस्ती गेल्या असता आरोपी क्र 1 याने फिर्यादिस "तु कशाला मध्ये आली" असे म्हणुन फिर्यादिच्या मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला तसेच आरोपी क्र. 1. व 2. यांनी फिर्यादिस व तिचे भावाला व आईला शिवीगाळ करून मारहाण केली व पुन्हा मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपीतांविरुध्द कलम 354, 323, 504, 506, 34 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सफौ. जवाहर चव्हाण 9545363121 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर